# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 19/09/2020 (शनिवार)
(दुपार)

---

### आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. भिवापुर :— अंतर्गत 19 कि.मी. अंतरावर सालेभट्टी चोर ता. भिवापुर येथे दिनांक 18/09/2020 चे 07.30 वा. दरम्यान आरोपी नामे— सुचिन सुखदेव इरदंडे, वय 35 वर्ष, रा. सालेभट्टी चोर ता. भिवापुर याने यातील फिर्यादी नामे — गोविंदराव शामराव अंभोरे, वय 52 वर्ष, रा. चिचाळा ता. भिवापुर यांची मुलगी मृतक नामे— सौ. निशा सुचिन इरदंडे, वय 23 वर्ष, रा. सालेभट्टी चोर ता. भिवापुर हिच्या माहेरून पैश्याची मागणी करून मागणी पुर्ण न झाल्याने तिला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केल्याने तिने सदर त्रासाला कंटाळुन दिनांक 18/09/2020 रोजी तिच्या विहीरीत उडी मारून मरण पावण्यास आरोपी (पति) हा कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन व तपासात आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो. स्टे. भिवापुर येथे आरोपी विरुध्द कलम 498 (अ), 306, 504, 506 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. शरद भस्मे 9764946808 हे करीत आहे.

### विनयभंग

1) पो.स्टे. कळमेश्वर :— दि. 18/09/2020 चे 14:30 वा. ते 15:30 वा. चे सुमारास फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी/पिडीत वय 12 वर्ष हि स्मशाणभुमी जवळ गायीला पाणी पाजण्याकरीता गेली असतांना आरोपी नामे— रजनीकांत दिलीप ईवनाते, वय 27 वर्ष, रा. वाठोडा ता. कळमेश्वर याने तिला एकटी असल्याचे पाहुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेस धमकी दिली की, 'सदर बाब कोणालाही सांगितल्यास जिवाने मारून टाकीन.'

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (अ), 323, 506 भादंवि. सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि रासकर 9082196080 हे करीत आहे.

2) पो.स्टे. अरोली :— दि. 16/09/2020 चे 17:00 वा. चे सुमारास 13 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि घरी स्वयंपाक करीत असतांना आरोपी नामे— गणेश विश्वनाथ कोहळे, वय 38 वर्ष, रा. तांडा ता. मौदा याने तिच्या घरात अनधिकृतपणे प्रवेश करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354 (अ), 506 भादंवि. सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि बारंगे 8788758742 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर